**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे-४११००१

श्री.नागेश हरिभाऊ अक्कलकोटे
२४६५, धुरपे बोळ, बार्शी, जिल्हा सोलापूर ४१३४०१ अपीलकर्ता

विरुध्द

**अपिलीय प्राधिकारी** तथा तहसीलदार,
तहसीलदार कार्यालय बार्शी, जिल्हा सोलापूर उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा निवासी नायब तहसीलदार,
बार्शी, जिल्हा सोलापूर

| | |
|---|---|
| १.अपील क्रमांक | ५८४ / सोलापूर / २००६ |
| २.सुनावणीची तारीख | ३१.१.२००८ |

३.उपस्थित

**अपीलकर्ता** श्री.नागेश हरिभाऊ अक्कलकोटे
२४६५, धुरपे बोळ, बार्शी, जिल्हा सोलापूर ४१३४०१

**अपिलीय प्राधिकारी** तथा तहसीलदार,
तहसीलदार कार्यालय बार्शी, जिल्हा सोलापूर तत्कालीन-श्री.के.बी.काकडे

| | |
|---|---|
| ४.जन माहिती अधिकाऱ्यांकडे केलेल्या अर्जाची तारीख | २८.५.२००७ |
| ५.जन माहिती अधिकाऱ्यांनी दिलेल्या आदेशाची तारीख | २४.१०.२००७ |
| ६.अपिलीय प्राधिकाऱ्यांकडे केलेल्या अपीलाची तारीख | १६.८.२००७ |
| ७.अपिलीय प्राधिकाऱ्यांनी दिलेल्या आदेशाची तारीख | २५.९.२००७. |

८. **मूळ अर्जात मागणी केलेली माहिती**

बार्शी तालुक्यात जानेवारी २००५ ते २९.५.२००७ पर्यंतचा प्रत्येक रॉकेल विक्रेत्यांना देण्यात आलेला निश्चित मंजूर कोटा, प्रत्यक्षात देण्यात आलेले प्रमाण कारणासह बार्शी शहर आणि तालुक्यातील रॉकेल विक्रेत्याचे नांव, मंजूर कोटा आणि देण्यात आलेले रॉकेल.

## विवेचन

जानेवारी २००५ ते मे २००७ पर्यंत बार्शी शहर आणि तालुक्यातील रॉकेल विक्रेत्यांना मंजूर असलेला कोटा व प्रत्यक्ष देण्यात आलेले रॉकेल या संदर्भातील तपशील अपीलकर्ता श्री.नागेश हरिभाऊ अक्कलकोटे यांनी जन माहिती अधिकारी तथा निवासी नायब तहसीलदार, बार्शी यांच्याकडे मागितला होता. जन माहिती अधिकाऱ्यांकडून माहिती मिळाली नाही, म्हणून श्री.अक्कलकोटे यांनी अपिलीय प्राधिकारी तथा तहसीलदार, बार्शी यांच्याकडे अपील केले. १५ दिवसात ही माहिती द्यावी, असे आदेश त्यांनी पुरवठा अव्वल कारकून यांना दिला. परंतु त्यांनतर जवळजवळ एक महिन्याने जन माहिती अधिकाऱ्यांनी माहिती दिली, तीही अपुरी व चुकीची असल्याचे नमूद करुन श्री.अक्कलकोटे यांनी राज्य माहिती आयोगाकडे अपील केले आहे.

श्री.अक्कलकोटे यांनी दि.२८.५.२००७ रोजी माहिती मागणीचा अर्ज केला, त्यावेळी जन माहिती अधिकारी म्हणून निवासी नायब तहसीलदार श्री.के.बी.काकडे काम पहात होते व त्यांच्याकडेच नंतरच्या काळात काही दिवस अपिलीय प्राधिकारी तथा तहसीलदार या पदाचा कार्यभार होता. त्यामुळे अपिलाची सुनावणीही त्यांनीच केली व १५ दिवसात माहिती देण्याचा आदेश दि.२५.९.२००७ रोजी पुरवठा अव्वल कारकून श्रीमती एस.बी.सोनवणे यांना त्यांनीच दिला. माहिती संकलित करण्याचे काम चालू असून ते पूर्ण होताच माहिती दिली जाईल, असे श्रीमती सोनवणे यांनी कळविले व त्यांनी सादर केलेली माहिती दि.२४.१०.२००७ रोजी तहसीलदारांनी अपीलकर्ता श्री.अक्कलकोटे यांना पाठविली. त्यातही रॉकेल विक्रेत्यांना देण्यात आलेला प्रत्यक्ष साठा एवढीच माहिती दिली. संबंधित कागदपत्रे आढळत नसल्याचे पुरवठा अव्वल कारकून यांनी कळविल्यानंतर प्रांत अधिकारी, सोलापूर यांनी संबंधितांविरुध्द गुन्हा दाखल करण्याचा आदेश दि.१२.९.२००७ रोजी दिला. त्यानुसार दि.१६.१०.२००७ रोजी संबंधितांना नोटिसा देण्यात आल्या व दि.२३.१०.२००७ रोजी संबंधितांनी खुलासा सादर केला. तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा निवासी नायब तहसीलदार श्री.के.बी.काकडे व अपिलीय प्राधिकारी तथा तहसीलदार श्री.व्ही.एम.कुचेकर यांनी दि.४.२.२००८ पर्यंत या

संदर्भात लेखी खुलासा करावा, त्यानंतर शास्तीसह अन्य मुद्दयांबाबत निर्णय घेतला जाईल, असा आदेश आयोगाने सुनावणीच्या वेळी दिला. अपीलकर्ता श्री.अक्कलकोटे यांना आठ दिवसात पूर्ण माहिती देऊन त्याची प्रत जन माहिती अधिकाऱ्यांनी आयोगाला सादर करावी, असेही आयोगाने आदेशित केले.

आपल्याकडे दि.२८.५.२००७ रोजी अपीलकर्ता श्री.अक्कलकोटे यांचा अर्ज आल्यानंतर दि.३०.५.२००७ रोजी आपण अर्ज पुरवठा शाखेत दिला व माहिती देण्याबाबत तोंडी आदेश दिले. त्यावर कोणतीही कार्यवाही झाली नाही, म्हणून दि.५.६.२००७ रोजी पुरवठा लिपिक श्री.व्ही.डी.कुलकर्णी व अव्वल कारकून श्री.ए.आर.टेळे यांना माहिती देण्याबाबत लेखी सूचना दिल्या. माहिती उपलब्ध नसून शोध घेण्याचे काम चालू आहे, असे श्री.कुलकर्णी व श्री.टेळे यांनी आपल्याला कळविले. दरम्यानच्या काळात दि.३.७.२००७ ते १५.७.२००७ पर्यंत तहसीलदार पदाचा कार्यभार आपल्याकडे आल्यामुळे निवडणूक नायब तहसीलदार श्री.डी.के.दराडे यांना आपण दि.३.७.२००७ रोजी जन माहिती अधिकारी पदाचा कार्यभार दिला. तहसीलदार पदाच्या या काळात श्री.अक्कलकोटे यांच्या अपिलाची सुनावणी करुन आपण दि.२५.९.२००७ रोजी १५ दिवसात माहिती देण्याचा आदेश पुरवठा अव्वल कारकून श्रीमती सोनवणे यांना दिला. दि.२६.९.२००७ पासून आपण पुन्हा जन माहिती अधिकारी तथा निवासी नायब तहसीलदार पदाचा कार्यभार स्वीकारला. वारंवार पाठपुरावा करुनही श्रीमती सोनवणे यांनी माहिती दिली नाही. अपिलात आपण दिलेल्या आदेशानुसार दि.१०.१०.२००७ पर्यंत त्यांनी माहिती द्यावयास हवी होती. त्यामुळे दि.१०.१०.२००७ रोजी आपण त्यांना पुन्हा पत्र दिले. त्यावर त्यांनी माहिती संकलित करण्याचे काम चालू असून विलंब लागेल, असे आपल्याला दि.११.१०.२००७ रोजी कळविले. दि.१५.१०.२००७ ते २६.१२.२००७ या कालावधीत आपण वैद्यकीय रजेवर होतो. दरम्यानच्या काळात निवडणूक नायब तहसीलदार श्री.डी.के.दराडे यांनी दि.२४.१०.२००७ रोजी श्री.अक्कलकोटे यांना माहिती दिली होती, असे तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा निवासी नायब तहसीलदार श्री.के.बी.काकडे यांनी दि.४.२.२००८ रोजी आयोगाला सादर केलेल्या खुलाशात म्हटले आहे.

अपिलाच्या निर्णयात दिलेल्या मुदतीनंतरही माहिती देण्यास १४ दिवस विलंब झाला, याला श्रीमती सोनवणे व श्री.काकडे हे दोघेच सर्वस्वी जबाबदार आहेत, असे अपिलीय प्राधिकारी तथा तहसीलदार श्री.व्ही.एम.कुचेकर यांनी दि.२.२.२००८ रोजी आयोगाला सादर केलेल्या स्पष्टीकरणात म्हटले आहे. अपीलकर्ता श्री.अक्कलकोटे यांनी दि.१६.८.२००७ ला अपील दाखल केले होते, त्याचा निर्णय श्री.काकडे यांनी दि.२५.९.२००७ रोजी दिला आहे. वस्तुतः आपण २१.९.२००७ रोजी तहसीलदार पदाची सूत्रे स्वीकारली. मग श्री.काकडे यांनी दि.२५.९.२००७ रोजी तहसीलदार तथा अपिलीय प्राधिकारी म्हणून अपिलाचा निर्णय कसा दिला हे आपल्यालाच अवगत झालेले नाही असेही तहसीलदार श्री.व्ही.एम.कुचेकर यांनी या खुलासापत्रात म्हटले आहे.

पूर्वीच्या पुरवठा लिपिकाने दिलेल्या पदभार यादीत संबंधित माहितीबाबतची कागदपत्रे नव्हती, त्यामुळे त्याचा शोध घेण्याचे काम चालू असल्याचे पुरवठा लिपिक श्री.कुलकर्णी व अव्वल कारकून श्री.टेळे यांनी दि.२९.६.२००७ रोजी, तर पुरवठा अव्वल कारकून श्रीमती सोनवणे यांनी दि.१२.९.२००७ रोजी निवासी नायब तहसीलदार यांना पाठविलेल्या खुलाशापत्रात नमूद केले असल्याचे कागदपत्रांवरुन दिसते.

श्री.अक्कलकोटे यांनी अर्ज केल्यापासून पाच महिन्यांपर्यंत कोणतीही माहिती दिली गेली नाही. या स्थितीत संबंधित कर्मचारी शास्तीस पात्र ठरतात. श्रीमती सोनवणे व श्री काकडे हे विलंबास जबाबदार असल्याचे श्री.व्ही.एम.कुचेकर, तहसीलदार, बार्शी यांनी त्यांच्या निवेदनात स्पष्टपणे म्हटले आहे. परंतु प्रत्यक्ष विलंब केवळ १४ दिवसांचा नसून चार महिन्याचा आहे व चार महिन्यानंतरसुध्दा पूर्ण माहिती दिलेली नाही. एकूण कागदपत्रे पाहता, पुरवठा शाखेत कायद्याने आवश्यक असलेली कागदपत्रेही योग्यरीत्या ठेवण्यात आलेली नाहीत, असे स्पष्ट होते. 'दिलेली माहिती खरी असून श्री.अक्कलकोटे यांना ही माहिती चुकीची आहे असे वाटत असले तर प्रत्येक दुकानदाराला दरमहा देण्यात आलेला रॉकेलचा साठा त्या दुकानदाराकडे असलेल्या साठा पुस्तकावरुन त्यांना उपलब्ध करुन घेता आला असता, परंतु केवळ त्रास देण्याच्या उद्देशाने माहितीच्या अधिकारात जुन्या माहितीची मागणी करुन ती वेळेत न मिळाल्यामुळे कर्मचाऱ्यांना अडचणीत आणण्याचा प्रयत्न केला जात आहे. कार्यालयीन व

इतर कामकाजामुळे माहितीच्या अधिकारात मागणी केलेली माहिती वेळेत उपलब्ध करुन देता येत नाही ही वस्तुस्थिती आहे,' असे श्री.व्ही.एम.कुचेकर यांनी दि.२.२.२००८ च्या खुलासापत्रात म्हटले आहे. ही भूमिका पूर्णत: चुकीची आहे. सन २००५-२००७ या काळातील माहिती जुनी आहे. असे म्हणता येणार नाही. दुकानदारांकडून अर्जदाराने माहिती स्वीकारावी असे म्हणणे स्वत:ची जबाबदारी झटकण्यासारखे आहे. तसेच कार्यालयीन व इतर कामकाजामुळे माहितीच्या अधिकारातील माहिती देता येत नाही हे कायद्याचे पालन न करण्याचे बेकायदेशीर समर्थन आहे.

एकूण कागदपत्रे व सर्व बाजूंची निवेदने यांचा विचार करता, विहित मुदतीत व परिपूर्ण माहिती देण्यात आलेली नाही. रॉकेल पुरवठ्यासारख्या सार्वजनिक महत्वाच्या विषयातील माहितीबाबतचे वर्षा दोन वर्षातील अभिलेखही पुरवठा शाखेत उपलब्ध होत नाहीत, हे अव्यवस्थेतून होते की जाणीवपूर्वक घडते, याबाबत संशय निर्माण व्हावा, अशी परिस्थिती आहे. श्री.काकडे, श्रीमती सोनवणे यांच्यासह संबंधित काळातील पुरवठा शाखेतील सर्व संबंधित कर्मचारी यात जबाबदार ठरतात. श्री.काकडे यांनी जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी म्हणून स्वत:च निर्णय द्यावेत, हे आक्षेपार्ह आहे. तसेच तहसीलदारपदी अन्य अधिकारी (श्री.व्ही.एम.कुचेकर) रुजू झालेले असतानाही अपिलाचा निर्णय त्यांनी द्यावा व तहसीलदारांना त्याची कल्पनाही नसावी हे कार्यालयीन अव्यवस्थेचे उदाहरण आहे. याबाबत संपूर्ण चौकशी होणे गरजेचे आहे. मात्र जन माहिती अधिकारी म्हणून श्री.काकडे यांनी पुरवठा शाखेतील श्री.कुलकर्णी, श्री.टेळे, श्रीमती सोनवणे यांना सातत्याने विचारणा करुन माहिती देण्याबाबत पाठपुरावा केलेला दिसतो. त्यामुळे ते जन माहिती अधिकारी असले तरी पुरवठा शाखेकडून प्रत्यक्ष माहिती न मिळाल्यामुळे देता आली नाही, हे त्यांचे निवेदन पाहता माहिती न देण्यास जबाबदार असण्यात त्यांचा वाटा मर्यादित ठरतो.

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

(१) अपील मान्य.

(२) जन माहिती अधिकारी तथा निवासी नायब तहसीलदार श्री.के.बी.काकडे यांनी माहिती देण्याबाबत प्रयत्न केला आहे, मात्र प्रथम अपिलाच्या हाताळणीबाबत त्यांनी घेतलेली भूमिका साशंकता निर्माण करणारी आहे. त्यांच्या या कृतीबाबत, तसेच तहसीलदार श्री.व्ही.एम.कुचेकर यांनी अपिलाच्या निर्णयासंबंधी आपल्याला अवगत नसल्याचे नमूद केले आहे त्याबाबत उपविभागीय अधिकारी, सोलापूर विभाग, सोलापूर यांनी चौकशी करुन दि.२५.८.२००८ पर्यंत आयोगाला अहवाल सादर करावा.

(३) माहितीची कागदपत्रे योग्य प्रकारे न ठेवल्याबद्दल व विहित मुदतीत माहिती न दिल्याबद्दल पुरवठा शाखेतील संबंधित कर्मचाऱ्यांना मिळून रु.२५०००/- शास्ती लावण्यात येत आहे. तहसीलदार, बार्शी यांनी श्रीमती सोनवणे, श्री.कुलकर्णी, श्री.ढेळे यांच्यासह पुरवठा शाखेतील संबंधित तत्कालीन कर्मचाऱ्यांची जबाबदारी निश्चित करुन सर्वांकडुन समान रकमेत शास्ती सप्टेंबर २००८ मध्ये मिळणाऱ्या ऑगस्ट २००८ च्या वेतनातून वसूल करुन ती दि.१५.९.२००८ पर्यंत '००७०, इतर प्रशासकीय सेवा, ६०, इतरसेवा, ८००, इतर जमा रकमा, (१८) माहितीचा अधिकार (००७०००१६१)' या लेखाशिर्षाखाली जमा करण्याची कार्यवाही करुन पूर्तता अहवाल आयोगाला सादर करावा. तसेच याबाबत संबंधितांच्या सेवापुस्तकात व गोपनीय अहवालात नोंद घेऊन त्याच्या छायांकित प्रती आयोगाला सादर कराव्यात. ही जबाबदारी अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, बार्शी, जि.सोलापूर यांची राहील.




( विजय कुवळेकर )
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

पुणे
दि.८.८.२००८

ऑगस्ट०८

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे-४११००१

श्री.दिलीप मकबूल शेख
१४३, सरवदेनगर, मुळेगांव रोड, सोलापूर — अपीलकर्ता

विरुध्द

**अपिलीय प्राधिकारी** तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक),
जिल्हा परिषद, सोलापूर — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा उपशिक्षणाधिकारी (माध्यमिक),
जिल्हा परिषद, सोलापूर

| | |
|---|---|
| १.अपील क्रमांक | ५९ / सोलापूर / २००६ |
| २.सुनावणीची तारीख | ३१.१.२००८ |

**३.उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.दिलीप मकबूल शेख
१४३, सरवदेनगर, मुळेगांव रोड, सोलापूर

**अपिलीय प्राधिकारी** तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक),
जिल्हा परिषद, सोलापूर श्री.मनोहर नाना वीर

**जन माहिती अधिकारी** तथा उपशिक्षणाधिकारी (माध्यमिक),
जिल्हा परिषद, सोलापूर श्री.जितेंद्र तुकाराम खंडागळे

| | |
|---|---|
| ४.जन माहिती अधिकाऱ्यांकडे केलेल्या अर्जाची तारीख | २१.६.२००६ |
| ५.जन माहिती अधिकाऱ्यांनी दिलेल्या आदेशाची तारीख | २१.७.२००६ |
| ६.अपिलीय प्राधिकाऱ्यांकडे केलेल्या अपीलाची तारीख | ७.८.२००६ |
| ७.अपिलीय प्राधिकाऱ्यांनी दिलेल्या आदेशाची तारीख | -- |

८. **मूळ अर्जात मागणी केलेली माहिती**

१. श्री.शेख दिलीप मकबुल (सहशिक्षक) यांच्या दि.१४.१०.१९९९ च्या जि.प.माध्यमिक शिक्षक कर्मचारी मान्यता शिबिरामध्ये दाखल करण्यात आलेल्या मान्यता प्रस्तावाची संपूर्ण साक्षांकित झेरॉक्स प्रत. सदर प्रस्तावावर शिक्षणाधिकारी यांच्याकडून करण्यात आलेल्या कार्यवाहीची माहिती मिळावी.
२. दि.६.८.२००५ रोजी ॲड.ए.जी.आय.खेरदी व दि.६.३.२००६ रोजी ॲड.एस.एस.कालेकर यांच्याकडून श्री.डी.एम.शेख(सहशिक्षक) बाबत शिक्षणाधिकारी यांना देण्यात आलेल्या नोटिसीवर काय कार्यवाही केली.
३. दि.६.३.२००५, २९.४.२००५, २५.५.२००५,२९.८.२००५ रोजी श्री.डी.एम.शेख (सहशिक्षक) यांच्याकडून शिक्षणाधिकारी याना देण्यात आलेल्या पत्रव्यवहारावर / अर्जावर काय कार्यवाही करण्यात आली.

## विवेचन

सौ.निलव्वाबाई खेडगी प्रशाला, अक्कलकोट, जि.सोलापूर या संस्थेने दि.१४.१०.१९९९ रोजी जिल्हा परिषद (माध्यमिक) शिक्षणाधिकारी / कर्मचारी शिबीरामध्ये दाखल केलेल्या मान्यता प्रस्तावाच्या संदर्भातील माहिती अपीलकर्ता श्री.दिलीप मकबूल शेख यांनी जन माहिती अधिकारी तथा उपशिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, सोलापूर यांच्याकडे मागितली होती. जन माहिती अधिकारी तथा उपशिक्षणाधिकारी यांनी हा अर्ज शाळेच्या मुख्याध्यापकांकडे पाठविला. शाळेचे जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक यांनी शुल्क कळविले. श्री.शेख यांनी मनीऑर्डरने शुल्क पाठविले. त्यानंतर मुख्याध्यापकांनी शाळेकडे पूर्ण माहिती नसून शिक्षणाधिकारी कार्यालयाकडेच मिळेल, असे श्री.शेख यांना व शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, सोलापूर यांना कळविले. माहिती देण्यास जाणीवपूर्वक टाळाटाळ होत असल्याचे नमूद करुन श्री.शेख यांनी अपिलीय प्राधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, सोलापूर यांच्याकडे अपील केले, ते विहित मुदतीत नसल्याच्या कारणावरुन अपिलीय प्राधिकाऱ्यांनी फेटाळले. त्याविरुध्द श्री.शेख यांनी राज्य माहिती आयोगाकडे अपील केले आहे.

श्री.शेख हे सौ.निलव्वाबाई खेडगी प्रशालेत सहशिक्षक असून त्यांच्या नियुक्तीच्या संदर्भातील मुख्य प्रश्न आहे. रिक्त पद नसताना संस्थेने श्री.शेख यांना नियुक्ती दिली व शिक्षण खात्यानेही त्याला मान्यता दिली. संस्थेची मराठी व कन्नड दोन्ही माध्यमे असून विनाअनुदानित विभागात श्री.शेख यांची नियुक्ती करण्यात आली होती. त्या काळातील वेतनाचा प्रश्न न्यायालयात आहे. जिल्हा न्यायालयात श्री.शेख यांच्या बाजूने निकाल लागला असून नियुक्ती विनाअनुदानित तत्त्वावर असल्याने त्यांना वेतन देण्याची जबाबदारी संस्थेची आहे. न्यायालयाच्या निर्णयानुसार संस्थेने हे वेतन अदा केलेले नाही. त्या संदर्भातील दावा जिल्हा न्यायालय, सोलापूर येथे प्रलंबित आहे. त्यामुळे शिक्षणाधिकारी कार्यालय (माध्यमिक), जिल्हा परिषद, सोलापूर यांनी या संदर्भात कोणतीही कार्यवाही केलेली नाही, असे शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, सोलापूर श्री.मनोहर नाना वीर यांनी आयोगासमोर लेखी व तोंडी नमूद केले. जुलै-१९९९ मध्ये सहशिक्षक म्हणून आपल्याला नियुक्त केल्यापासूनची अनेक कागदपत्रे श्री.शेख यांनी मागितली, परंतु कायमस्वरुपी जतन करण्याचे हे अभिलेख नसल्यामुळे सदर कागदपत्रे उपलब्ध होत नाहीत, असेही त्यांनी स्पष्ट केले. संस्थेची आर्थिक परिस्थिती चांगली नाही त्यामुळे न्यायालयाच्या आदेशानुसार वेतनाची रक्कम देता आली नाही, निधीच्या उपलब्धतेनुसार ती देण्यात येईल, असे संस्थेच्या वतीने सांगण्यात आल्याचे जन माहिती अधिकारी तथा उपशिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, सोलापूर श्री.जितेंद्र तुकाराम खंडागळे यांनी नमूद केले. दरम्यानच्या काळात श्री.शेख यांची मराठी माध्यमाच्या शाळेत नियमित नियुक्ती झाली असून शिक्षणाधिकारी (माध्यमिक) यांनी त्याला मान्यताही दिलेली आहे, असे उभय बाजूंनी सांगितले.

उभय बाजूंची निवेदने व सादर करण्यात आलेली कागदपत्रे पाहता मूळ प्रश्न माहितीपेक्षा मागील वेतनाचा आहे. श्री.शेख यांनी माहितीचे म्हणून नोंदविलेले अनेक मुद्दे स्पष्टीकरण, खुलासा व भाष्य याची मागणी करणारे आहेत. हा भाग माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कक्षेत येत नाही. मात्र महर्षी विवेकानंद समाजकल्याण संस्था, अक्कलकोट संचलित सौ.निलव्वाबाई खेडगी प्रशाला, अक्कलकोट व अनंत प्रशाला, हन्नुर, ता.अक्कलकोट या दोन्ही प्रशालांमधील मिळून शिक्षक-शिक्षकेतर कर्मचाऱ्यांची सेवाज्येष्ठता यादी, भविष्य निर्वाह निधीच्या खात्याबाबतच्या सद्यस्थितीची माहिती, मान्यता प्रस्तावाची

शाळेकडील मूळ प्रस्तावानुसार साक्षांकित प्रत प्रशालेकडून प्राप्त करुन घेऊन आठ दिवसात द्यावी, असे आदेश आयोगाने सुनावणीच्या वेळीच जन माहिती अधिकाऱ्यांना दिले.

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

(१) अपील अंशतः मान्य.

(२) आयोगाने दिलेल्या आदेशाचा अनुपालन अहवाल जन माहिती अधिकारी तथा उपशिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, सोलापूर यांनी हा आदेश प्राप्त झाल्यापासून आठ दिवसात आयोगाला सादर करावा.

पुणे
दि.४.८.२००८

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र, पुणे खंडपीठ.

( विजय कुवळेकर )
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

ऑगस्ट-०८-

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे-४११ ००१

राज्य माहिती आयोगाच्या पुणे खंडपीठातर्फे 'विशेष अपील निर्गत कार्यक्रम' दि. १२.६.२००८ रोजी पुणे येथे आयोजित करण्यात आला होता. त्यात खालील अपिलाचा समावेश होता :

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ६०९ / पुणे | उपस्थिती |
| २ | अपीलकर्ता | श्री. हरकचंद मणिलाल खाबिया<br>१४९/१, मारूती आळी, शिरूर, जि. पुणे | गैरहजर |
| ३ | जन माहिती अधिकारी | प्राचार्य, चांदमल ताराचंद बोरा महाविद्यालय,<br>शिरूर, ता. शिरूर, जि. पुणे | हजर |
| ४ | अपिलीय प्राधिकारी | सेक्रेटरी, शिरूर शिक्षण प्रसारक मंडळ, शिरूर,<br>ता. शिरूर, जि. पुणे | हजर |

अपीलकर्ता श्री. हरकचंद मणिलाल खाबिया यांनी चांदमल ताराचंद बोरा कॉलेज ऑफ कॉमर्स अँड ऑटर्स् मधील ११ व १२ इयत्ता व व्हेकेशनल कोर्स बद्दल एकूण ११ मुद्दयांची माहिती मागितली होती.

मुदतीत आवश्यक ती सर्व माहिती देण्यात आल्याचे जन माहिती अधिकारी यांनी स्पष्ट केले. तसेच आयोगास अग्रेषित केलेल्या दि. ११ जून २००८ मध्ये नमूद असलेल्या पत्राद्वारे अपीलकर्त्याने माहिती मिळाल्याचे मान्य केले आहे. सदरचे पत्र जन माहिती अधिकारी यांनी समक्ष सादर केले.

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**पुणे**
**दि.** ३०.८.२००८

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र, पुणे खंडपीठ

**( विजय कुवळेकर )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अवये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे-४११ ००१

राज्य माहिती आयोगाच्या पुणे खंडपीठातर्फे 'विशेष अपील निर्गत कार्यक्रम' दि.१९.६.२००८ रोजी सोलापूर येथे आयोजित करण्यात आला होता. त्यात खालील अपिलाचा समावेश होता :

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ६१३ / सोलापूर | उपस्थिती |
| २ | अपीलकर्ता | श्री. शिवाजी हणमंत सुगरे<br>सलगरवस्ती, डोणगांव रोड, सोलापूर | हजर |
| ३ | जन माहिती अधिकारी | मुख्याध्यापिका, स.रा. मोरे विद्यामंदिर,<br>सोलापूर | हजर |
| ४ | अपिलीय प्राधिकारी | अध्यक्ष, मनोरमा बहुउद्देशीय वृक्ष संवर्धन,<br>क्रीडा व शिक्षण प्रसारक संस्था, सोलापूर | हजर |

अपीलकर्ता श्री. शिवाजी हणमंत सुगरे यांनी स.रा. मोरे विद्यामंदिर, सोलापूर शाळेस मान्यता प्राप्त झाली त्यावेळेस किती व कोणत्या इयत्तेचे वर्ग होते, कार्यरत शिक्षक, विद्यार्थी हजेरपट व मस्टरची नक्कल तसेच शिक्षकेतर भरलेली पदे, नेमणुक आदेश, त्यास शिक्षणाधिकारी यांनी दिलेली मान्यता इत्यादी संबंधी माहिती जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापिका, स.रा. मोरे विद्यामंदिर, सोलापूर यांच्याकडे मागितली होती.

मागणी केलेली सर्व माहिती आपणास मिळाली असल्याने तक्रार राहिलेली नसल्याचे निवेदन अपीलकर्त्याने अपिलीय प्राधिकारी यांना दि. १.९.२००७ अन्वये दिले. सदर निवेदनाची प्रत जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी आयोगास सादर केली.

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

पुणे
दि. 30 .६.२००८

( विजय कुवळेकर )
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौंसिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

श्री.दिपक किसनराव बारगजे
नगरपालिकेसमोर, अक्कलकोट, ता.अक्कलकोट, जि.सोलापूर अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक),
जिल्हा परिषद, सोलापूर उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा मुख्याध्यापिका निर्मलाराजे कन्या प्रशाला,
अक्कलकोट, ता.अक्कलकोट, जि.सोलापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ६२ / सोलापूर /२००६ |
| २ | सुनावणीची तारीख | दि. १.२.२००८ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.दिपक किसनराव बारगजे
नगरपालिकेसमोर, अक्कलकोट, ता.अक्कलकोट, जि.सोलापूर

**अपिलीय प्राधिकारी** तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक),
जिल्हा परिषद, सोलापूर श्री.एम.एन.वीर

**जन माहिती अधिकारी** तथा मुख्याध्यापिका निर्मलाराजे कन्या प्रशाला,
अक्कलकोट, ता.अक्कलकोट, जि.सोलापूर श्रीमती के.एस.सुरवसे

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. ११.४.२००६ व ३.५.३००६ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. ९.५.२००६ व १.८.२००६ |

| | | |
|---|---|---|
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. १९.५.२००६ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. ३.७.२००६ |
| ८ | **मूळ अर्जात मागणी केलेली माहिती**<br><br>श्रीमंत राणी निर्मलाराजे कन्या प्रशालेमधील<br>अ)सूचना वही-दि.१.१.१९९९ ते ३०.१२.१९९९ या कालावधीतील शिक्षक तथा विद्यार्थ्यांसाठीच्या मूळ सूचना वहीची झेरॉक्स प्रत.<br>ब)परीक्षा विभाग वही -खाली नमूद शालेय परीक्षांचे, सुपरवायझर्स व रिलिव्हर्स यांच्या अलॉटमेंट नोंद असलेल्या मूळ वहीची झेरॉक्स प्रत.<br>तिसरी / चौथी घटक चाचणी(नऊमाही)(शै.वर्ष १९९८-९९), द्वितीय सत्र परीक्षा (वार्षिक) (शैक्षणिक वर्ष १९९८-९९), पहिली/दुसरी घटक चाचणी (तिमाही)(शैक्षणिक वर्ष१९९९-२०००) परीक्षांच्या वेळापत्रकांसह<br>क)प्रोसिडिंग बुक-दि.५.७.१९९९ पूर्वीची लगतची सभा, दि.५.७.१९९९ रोजीची सभा व दि.५.७.१९९९ नंतरच्या लगतच्या दोन सभा, प्रशालेच्या स्थानिक शालेय समितीच्या नमूद सभांच्या प्रोसिडिंग मॅटर्सची अस्सल बुकची झेरॉक्स प्रत.<br>ड)सेवक संच मान्यता-खाली नमूद शैक्षणिक वर्षाच्या सेवक संच मान्यतेच्या झेरॉक्स प्रती. १९९६-१९९७ ते २००५-२००६<br>इ)श्री.अमोल अरविंद कोकाटे अर्धवेळ सहशिक्षक, यांच्या वैयक्तिक मानयतेसाठी शाळेने शिक्षणाधिकाऱ्यांना सादर केलेला संपूर्ण प्रस्ताव(नियुक्ती आदेश व नियुक्तीसाठीच्या ठरावासह) आणि शिक्षणाधिकाऱ्यानी दिलेली वैयक्तिक मान्यता. | |

## विवेचन

श्रीमंत राणी निर्मलाराजे कन्या प्रशालेतील दिनांक १.१.१९९९ ते दि.३०.१२.१९९९ या कालावधीतील शिक्षक व विद्यार्थ्यांच्या मूळ सूचनावहीची प्रत, तसेच १९९६ ते २००६ या कालावधीतील सेवक संच मान्यतेच्या प्रती, तसेच संस्थेच्या श्री.अमोल अरविंद कोकाटे यांच्या नियुक्तीचा विद्यावर्धिनी, मराठा मंदिर संस्थेचा प्रस्तााव इ. माहिती दोन अर्जाद्वारे अपीलकर्ता श्री.दिपक किसनराव बारगजे यांनी जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापिका, निर्मलाराजे कन्या प्रशाला, अक्कलकोट, ता.अक्कलकोट, जि.सोलापूर यांच्याकडे केली होती. संबंधित माहिती संस्थेच्या अधिपत्त्यात असल्यामुळे त्यांच्या परवानगीने घ्यावी, असे जन माहिती

अधिकारी तथा मुख्याध्यापिका यांनी कळविले. माहिती न मिळाल्यामुळे श्री.बारगजे यांनी अपिलीय प्राधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, सोलापूर यांच्याकडे अपील केले. माहिती देण्याचे मुयाध्यापिका यांनी मान्य केले व माहिती त्वरित देण्याचा आदेश देऊन अपिलीय प्राधिकाऱ्यांनी अपील निकाली काढले. मात्र त्यानंतर मुख्याध्यापिका श्रीमती के.एस.सुरवसे यांनी 'श्री.बारगजे यांचे प्रकरण मुंबई उच्च न्यायालय येथे न्यायप्रविष्ट आहे,' असे कळवून माहिती दिली नाही, म्हणून श्री.बारगजे यांनी राज्य माहिती आयोगाकडे अपील केले आहे.

श्री.बारगजे वरील संदर्भात संस्थेकडे सातत्याने विविध पत्रे व अर्ज यांद्वारे माहिती मागत आले आहेत. श्री.बारगजे यांना दि.३०.४.२००१ रोजी शाळेतून कमी करण्यात आले होते, त्याविरुध्द त्यांनी पीठासन अधिकारी, सोलापूर यांच्याकडे दावा दाखल केला होता. अस्तित्वात नसलेली कागदपत्रे तयार करुन श्री.बारगजे यांनी संस्थेची फसवणूक केलेली आहे, असे नमूद करुन पीठासन अधिकाऱ्यांनी त्यांचे अपील रद्द ठरविले होते, असे श्रीमती सुरवसे यांनी आयोगापुढील सुनावणीत नमूद केले. तसेच अशा स्वरुपाच्या माहितीबाबत श्री.बारगजे यांनी केलेले एक अपील राज्य मुख्य माहिती आयुक्त डॉ.सुरेश जोशी यांनी दि.१८.११.२००६ रोजी अमान्य केल्याचे संबंधित कागदपत्रांसह नमूद केले. श्री.बारगजे यांच्या संदर्भातील प्रकरण उच्च न्यायालयात असल्यामुळे माहिती देता येत नाही, अशी जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापिका यांची भूमिका आहे. परंतु प्रकरण न्यायप्रविष्ट असले तरी जी माहिती देऊ नये असे स्पष्ट आदेश उच्च न्यायालयाने दिले असतील तरच त्या आधारे माहिती नाकारणे योग्य ठरेल. संदर्भित प्रकरणात अशा प्रकारचा आदेश उच्च न्यायालयाने दिलेला नाही, त्यामुळे देय माहिती दिली जाणे आवश्यक आहे. त्या त्या कागदपत्रांचा जतन करण्याचा कालावधी व त्याबाबतची नियमातील तरतूद लक्षात घेऊन अशी माहिती आठ दिवसात द्यावी, असे आदेश आयोगाने सुनावणीच्या वेळी दिले.

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

# आदेश

(१) अपील अमान्य.

(२) श्री.दिपक किसनराव बारगजे यांच्या संदर्भातील प्रकरण न्यायालयात प्रलंबित असले तरी त्या त्या कागदपत्रांचा जतनाचा कालावधी तपासून देय माहिती देण्याबाबतच्या आयोगाच्या आदेशाची पूर्तता केल्याबाबतचा अहवाल जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापिका, निर्मलाराजे कन्या प्रशाला, अक्कलकोट, ता.अक्कलकोट, जि.सोलापूर श्रीमती के.एस.सुरवसे यांनी हा आदेश प्राप्त झाल्यापासून आठ दिवसात आयोगाला सादर करावा. याबाबतची कार्यवाही पूर्ण करुन घेण्याची जबाबदारी अपिलीय प्राधिकारी तथा शिक्षणाधिकारी(माध्यमिक), सोलापूर श्री.एम.एन.वीर यांची राहील.

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र
पुणे खंडपीठ

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

पुणे
दि. २७.८.२००८

ऑगस्ट-०८-९६-९९

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**<u>माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.</u>**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

राज्य माहिती आयोगाच्या पुणे खंडपीठातर्फे 'विशेष अपील निर्गत कार्यक्रम' दि. १२.६.२००८ रोजी पुणे येथे आयोजित करण्यात आला होता. त्यात खालील अपिलाचा समावेश होता :

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ६३९ / पुणे | उपस्थिती |
| २ | अपीलकर्ता | श्री. एम. डी. गोगावले<br>१८, क्विन्स गार्डन, बी बिल्डिंगसमोर, बैठी चाळ, सर्कीट हाऊस, वैद्य चौक, पुणे-१ | हजर |
| ३ | जन माहिती अधिकारी | कार्यकारी अधिकारी<br>सार्वजनिक बांधकाम विभाग, पुणे-१ | हजर |
| ४ | अपिलीय प्राधिकारी | अधीक्षक अभियंता,<br>सार्वजनिक बांधकाम विभाग, पुणे-१ | हजर |

अपीलकर्ता श्री. एम.डी. गोगावले यांनी सन १९९७ ते माहे ऑगस्ट २००६ अखेर गृह वाटपासंबंधित माहिती मागितली होती.

वरील तीनही घटकांमधील चर्चा, त्यांनी सादर केलेली निवेदने व चर्चेअंतीचा निष्कर्ष विचारात घेता जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकाऱ्यांनी अपीलकर्त्यास मूळ अर्जानुसार व अपिलात मागितलेली अतिरिक्त माहितीही दिलेली आहे. याखेरीज अपीलकर्त्याच्या काही शंका असल्यास अपीलकर्त्यास माहिती व अभिलेख अवलोकनासाठी उपलब्ध करून देण्याचे जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी मान्य केले होते. त्यानुसार श्री. गोगावले यांना दि. ३०.६.२००८ रोजी विषयांकित माहितीची पाहणी करू देण्यात आली. सदर माहितीबाबत श्री. गोगावले यांचे समाधान झाल्याचे जन माहिती अधिकारी यांनी दि.२२.७.२००८ रोजीचे पत्रान्वये आयोगास अवगत केले असून दोघांच्या संयुक्त सहीचे इतिवृत्त आयोगास सादर केले आहे.

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

## <u>आदेश</u>

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**पुणे**
**दि. २१ .०८.२००८**

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र * पुणे खंडपीठ *

**( विजय कुवळेकर )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

११.६.०८

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे-४११ ००१

राज्य माहिती आयोगाच्या पुणे खंडपीठातर्फे 'विशेष अपील निर्गत कार्यक्रम' दि.१२.६.२००८ रोजी पुणे येथे आयोजित करण्यात आला होता. त्यात खालील अपिलाचा समावेश होता :

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ६४६ / पुणे | उपस्थिती |
| २ | अपीलकर्ता | श्री. किरण परसू माने<br>रा. सर्व्हे क्र.१९/१+८ब, प्लॉट क्र.३७,<br>हिंगणे होम कॉलनी, कर्वेनगर, पुणे-५२ | गैरहजर |
| ३ | जन माहिती अधिकारी | संशोधन अधिकारी तथा सदस्य सचिव, विभागीय जात प्रमाणपत्र पडताळणी समिती, पुणे | हजर |
| ४ | अपिलीय प्राधिकारी | विभागीय आयुक्त तथा अध्यक्ष, विभागीय जात प्रमाणपत्र पडताळणी समिती, पुणे | गैरहजर |

अपीलकर्ता श्री. किरण परसू माने यांनी सन २००० ते ऑक्टोबर २००६ या कालावधीत कर्नाटक राज्यातील जातीचा दाखला असलेल्या व सध्या महाराष्ट्र शासनाच्या अनुदानित संस्थेच्या सेवेत असलेल्या कर्मचाऱ्यांची तसेच वैद्यकीय, अभियांत्रिकी महाविद्यालयातून जाती प्रमाणपत्र पडताळणी झालेल्या / न झालेल्या प्रकरणांची विहित तक्त्यात माहिती मागितली होती.

सदरहू समितीमार्फत केवळ महाराष्ट्रातील जातीचा दाखला असणाऱ्या व्यक्तींची जात प्रमाणपत्र पडताळणी करण्यात येते. त्यामुळे अन्य राज्यातील जातीच्या प्रमाणपत्राची पडताळणी करण्याचा प्रश्न उद्भवत नाही, ही वस्तुस्थिती जन माहिती अधिकारी तथा संशोधन अधिकारी/सदस्य सचिव, विभागीय जात प्रमाणपत्र पडताळणी समिती, पुणे यांनी अपीलकर्त्यास कळविली आहे. मागितलेली माहिती अतिव्याप्त असून जन माहिती अधिकारी यांचे उत्तर रास्त आहे.

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**पुणे**
**दि. ३०.८.२००८**

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र, पुणे खंडपीठ

**( विजय कुंवळेकर )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**